वर्ष १८ वे

अंक ३ रा

## सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**शरदचंद्रजी पवार प्रेक्षागृह (१ला मजला)**

नवीन जिल्हा परिषद, पुणे कॅम्प, (एस.जी.मॉल शेजारी), पुणे - ४११ ००१.

**रविवार दि.१९.०८.२०१८ रोजी सकाळी १०.०० वा.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

यांचे मुखपत्र

# संवाद

### वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले - ९८४८ चौ.फूट व पार्किंग २४६२ चौ.फूट).
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०′ x १४′
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.
- **पूर्ण** चार मजले बांधून पूर्ण झाले असून त्यामध्ये १६० विद्यार्थ्यांची राहाण्याची सोय केली आहे.

**ऑगस्ट-सप्टें.-ऑक्टो.-नोव्हेंबर २०१८**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : ०४ ऑगस्ट, २०१८ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.१९.०८.२०१८** रोजी **सकाळी १०.३० वा. शरदचंद्रजी पवार प्रेक्षागृह (१ला मजला)** नवीन जिल्हा परिषद, पुणे कॅम्प, (एस.जी.मॉल शेजारी), पुणे - ४११ ००१ येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.०६.०८.२०१७ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०१७-२०१८ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०१८-२०१९ साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०१८-२०१९ साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.१०.०८.२०१८** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**❋ आपले नम्र ❋**

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ढुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, विलास ढुबे, किरण तिकोने.**

## ❋ कार्यक्रमाचे स्थळ ❋

**शरदचंद्रजी पवार प्रेक्षागृह (१ला मजला)**, नवीन जिल्हा परिषद, (एस.जी.मॉल शेजारी), पुणे कॅम्प.

**रविवार दि. १९.०८.२०१८ रोजी सकाळी १०.०० वा.**

**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि.१९.०८.२०१८** रोजी **सकाळी १०.०० वा. पुणे शरदचंद्रजी पवार प्रेक्षागृह (१ला मजला)**, नवीन जिल्हा परिषद, पुणे कॅम्प, (एस.जी.मॉल शेजारी), पुणे - ४११ ००१ येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

**✻ अध्यक्ष ✻**

**मा.राम शिंदे,**

**मंत्री, जलसंधारण, महाराष्ट्र तथा पालकमंत्री, अहमदनगर जिल्हा.**

**✻ प्रमुख पाहुणे ✻**

**मा.संभाजी लांगोरे,**

**उपायुक्त, पुणे महसुल विभाग, महाराष्ट्र राज्य.**

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

**✻ आपले नम्र ✻**

**हौसाराम घोडके** – अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ढुबे** – अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे** – उपाध्यक्ष

**सुनील पोटे** – सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप** – सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे** – कार्यवाहक

**अशोक वाबळे** – सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, विलास ढुबे, किरण तिकोने.**

## ✻ कार्यक्रमाचे स्थळ ✻

**शरदचंद्रजी पवार प्रेक्षागृह (१ला मजला)**

नवीन जिल्हा परिषद, पुणे कॅम्प, (एस.जी.मॉल शेजारी), पुणे - ४११ ००१.

**रविवार दि. १९.०८.२०१८ रोजी सकाळी १०.०० वा.**

**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

**कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

सन २०१८ मध्ये इयत्ता १० वी व १२ वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन! या यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच विविध क्षेत्रांमध्ये तसेच स्पर्धात्मक परीक्षेमध्ये यश मिळविलेल्या सर्व यशवंतांचे कौतुक करण्यासाठी दि.१९.०८.२०१८ रोजी पुणे येथे नवीन जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये स्नेहमेळाव्याचा कार्यक्रम आपल्या मित्र मंडळाने आयोजित केला आहे. **या कार्यक्रमास आपण सहकुटुंब उपस्थित राहून विद्यार्थी व गुणवंत ग्रामस्थांच्या गौरव कार्यक्रमाचे साक्षीदार व्हावे, असे मी आपणास आवाहन करतो.**

या काय्रक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे पारनेर तालुका मित्र मंडळाच्या प्रगतीमध्ये ज्यांचा सिंहाचा वाटा आहे, ते मित्र मंडळाचे **अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके** व त्यांच्या सहचारिणी **सौ.विमलताई घोडके** यांच्या ७५ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त त्यांचा **अमृतमहोत्सव** पारनेर तालुका मित्र मंडळाच्या वतीने साजरा करण्यात येत आहे. या अमृत महोत्सवासाठी आपल्या **अहमदनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.प्रा.राम शिंदे** हे अध्यक्षपद भूषविणार आहेत. तसेच **पुणे महसूल विभागाचे उपायुक्त व कर्जत तालुक्यातील रहिवासी श्री.संभाजी लांगोरे** हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. श्री.घोडके यांनी पारनेर तालुक्यातील नागरिकांसाठी जे योगदान दिले आहे, जी सेवा ते करीत आहेत, त्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आपण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे, ही विनंती. 'कर्तृत्व पारनेरकरांचे' या सदरामध्ये श्री.हौसाराम घोडके यांचा परिचय दिला आहे, कृपया त्याचे आपण वाचन करावे.

पारनेर तालुका मित्र मंडळाच्या विद्यार्थी वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. तेथे सोलर वॉटर हिटरच्या व्यवस्थेचेही काम प्रगतिपथावर असून तेही लवकरच पूर्ण होईल. मी नेहमीप्रमाणे आताही 'मुलींच्या वसतिगृहासाठी' जागा मिळविण्याच्या प्रयत्नाची आपणास आठवण करून देत आहे. त्यासाठी आपणाकडून प्रतिसाद मिळावा, ही अपेक्षा. **श्री.तारकराम झावरे व श्री.हौसाराम घोडके यांनी दिलेल्या रूपये एक लाख देणगीबद्दल त्यांना धन्यवाद!** आपणाकडूनही अशाच प्रकारच्या योगदानाची अपेक्षा आहे. पारनेर तालुका मित्र मंडळ समाजासाठी जास्तीत जास्त विकास कामे करण्यासाठी कटीबद्ध आहे, याची परत एकदा आपणा सर्वांना ग्वाही देऊन या जगन्नाथाचा रथास आपणास श्रम, वेळ, पैसा, मार्गदर्शन यातील जे जे शक्य होईल ते ते देऊन हातभार लावावा, असे मित्र मंडळातर्फे आपणास आवाहन करून संपदकीयास अर्धविराम देतो.

जय जिजाऊ! जय शिवराय!!

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | |
|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ |
| श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| श्री.विलास ठुबे | सदस्य | ९४२३४६५९८४ |
| श्री.किरण तिकोणे | सदस्य | ९८२२३४६१३८ |

## वसतिगृह प्रवेश

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे** चे सर्व सोयींनी युक्त असे **वसतिगृह** मंगलनगर, गल्ली नं. ८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे असून प्रवेशासाठी खालील पदाधिकायांशी संपर्क साधावा.

**व्यवस्थापक - श्री.संजय जंगम - मो. ९४२३० २२१२३, ९९२१८ ५३३२३ (वेळ दु.३ ते ७)**

# विद्यार्थी गौरव - १०वी


कु.प्रनोती प्रविण मोरे,
वडझिरे ९७.६%


प्रज्योत प्रविण मोरे,
वडझिरे ९५%


सिद्धेश्वर गोवर्धन खिलारी ,
बाभुळवाडे ९२.६०%


कु. श्रेया विलास ढुबे,
का.पठार ९२%


अथर्व पोपट सरडे,
यादववाडी ९२%


कार्तिक नानासो काकडे,
डिकसळ ९२%


कु. गौरी बाबाजी जगताप,
पिंपळगाव रोठा ९१.४०%


कु. किरण गोरख जगताप,
पिंपळगाव रोठा ९१%


कु. तनुश्री शंकरराव ढुबे,
का.पठार ९१%


कु. वैष्णवी प्रल्हाद खोसे,
पाडळी दर्या ९१%


ओंकार सुभाष दिवटे,
बाबुर्डी ९०.८८%


कु. साक्षी सुनील शिंगवी,
पारनेर ९०%


कु. श्रावणी सुनील निंबाळकर,
गांजीभोयरे ८८.२२%


सौरभ सुभाष गदादे,
रा.पुणे ८८%


विजय अभिषेक भगत
८७.८०%


सुरज सुभाष जगताप,
बाबुर्डी ८७.१०%


यश एकनाथ शेंडकर,
लो.मावळा ८३.४०%


अथर्व रामराव लामखडे,
निघोज ८३%


तेजस प्रमोद बोचरे,
गुणोरे ७९%



पार्थ सुमंत घोडके,
पारनेर ७७%


प्रथमेश रमेश भोसले,
अळकुटी ७५%


ऋग्वेद महेश वराळ,
निघोज ७४%

**१२वी सायन्स →**



कु.ज्ञानल सुरेश शेळके,
रा.नारायण गव्हाण ९३.६९%


कु.पौर्णिमा गोरक्ष जगताप,
रा.बाबुर्डी ९२.४६%


कु. नयन रमेश जगदाळे,
बाभुळवाडे ९०.४६%



कु.भाविका राहुल चुत्तर,
रा.कान्हुर पठार ८७%


विजय बळवंत जाधव,
रा.ना.गव्हाण ८३%


कु. साक्षी सुनील बोचरे,
गुणोरे ८१%


चेतन सुनील वराळ,
रा.निघोज ८०%



कु.सुप्रिया विलास आंधळे,
रा.क.हरेश्वर ७९%


कु. मुद्रा जगन्नाथ देंडगे,
गांजीभोयरे ७८%


कु.अनुष्का नितीन रेपाळे,
रा.पुणेवाडी ७८%


वैभव दत्तात्रय पठारे,
पठारवाडी ७५.१६%


कु.ऋषिका श्रीकांत
खोडदे, रा.किन्ही ७३%


अजिंक्य रघुनाथ रांधवन,
रा.टा.ढोकेश्वर ७३%

## १२वी सायन्स


कु. निधी राजेंद्र थोरात,
पाडळीआळे ६८%


अभिषेक लक्ष्मण म्हस्के,
सांगवी सुर्या ६५%


कु.सानिया सुधीर लोंढे,
रा.कान्हुर पठार ६०%

## १२वी आर्टस्


दिपक संजय जाधव,
पानोली ६०%

## इतर


**महेश संपत टकले,**
रा.ढवळपुरी,
**नीट परीक्षेमध्ये**
**५४३ गुण** मिळवून
उत्तीर्ण झाला.

## १२वी वाणिज्य


कु. युक्ता शरद ठुबे,
का.पठार ९३.५%


कु.प्रियांका बाळासाहेब शिंदे,
रा.बाभुळवाडे ७२%


कु. ईश्वरी अनंतराव मातेरे,
बाभुळवाडे ६५%


कु. ऋतुजा गणेश खोसे,
पाडळी दर्या ६४%

## ग्रामस्थांचा सत्कार


श्री. तारकराम व सौ. जयश्री झावरे

**सौ. जयश्री तारकराम व श्री. तारकराम सिताराम झावरे** रा. टाकळी ढोकेश्वर यांनी त्यांच्या **आजी गिताई लक्ष्मण झावरे व आजोबा लक्ष्मण पुंजाजी झावरे** यांचे स्मरणार्थ मंडळाच्या वसतिगृहाच्या एका खोलीसाठी **रू.१,००,०००/-** देणगी दिली. त्यांची आतापर्यंतची देणगी **रू.१,१३,०००/-** झाली आहे.


श्री. विजयकुमार व सौ. सुजाता ठुबे

**सौ. सुजाता विजयकुमार व श्री. विजयकुमार गोविंदराव ठुबे,** रा. कान्हूर पठार यांनी मंडळाच्या बांधकाम निधीसाठी **रू.५०,०००/-** देणगी दिली. त्यांची एकूण देणगी **रू.३,१४,०००/-** झाली आहे.


श्री. हौसाराम व सौ. विमल घोडके

**सौ. विमल हौसाराम व श्री. हौसाराम विठ्ठलराव घोडके,** रा. पारनेर यांनी त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त मंडळास **रू.१,००,०००/-** देणगी दिली. त्यांची आतापर्यंतची देणगी **रू.४,१५,०००/-** झाली आहे.


**श्री. मयुरेश विठ्ठल ढवळे,** रा.गुणोरे हे बी.टेक. (सिव्हील) असून ते **केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे (युपीएससी) इंडीयन इंजिनियरिंग सर्व्हीसेस (आयआरसी)** या विभागात पहिल्याच प्रयत्नात यशस्वी झाले. त्यांचा देशपातळीवर **गुणानुक्रमांकाने १४१ नंबर** आला.

**श्री.भूषण गिरीष मुथीयान** रा.अळकुटी यांनी **बी.ई. (इ.अँड टी.सी.)** नंतर **सॅन होजे स्टेट युनिव्हरसिटी कॅलीफोर्नीया** येथे **एस.एस.** केले


**डॉ. प्रियदर्शनी सदाशिव जगदाळे,** राह. बाभुळवाडे यांची **एम.बी.बी.एस.** नंतर **नेत्रशल्य विशारद (एम.एस. ऑप्थोल्मॉलॉजी)** साठी निवड झाली. त्यानिमित्त पिताश्री **डॉ.सदाशिव जगदाळे** यांनी मंडळास **रू.११११/-** देणगी दिली.

### -: क्रिडा :-

**कु. ईश्वरी अनंतराव मातेरे,** रा. बाभुळवाडे ही नुकतीच **१२वी कॉमर्स उत्तीर्ण** झाली असून टेनिस खेळाडू म्हणून तिने खालीलप्रमाणे यश प्राप्त केले. (१) **२०१२-१३** मध्ये १४ वर्षाखालील मुलींच्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाने **सुवर्ण पदक** प्राप्त केले. (२) स्कुल फेडरेशन ऑफ इंडिया च्या **२०१४** मध्ये ५९ व्या १७ वर्षाखालील मुलींच्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांकाने **सुवर्ण पदक** प्राप्त केले. (३) स्कुल फेडरेशन ऑफ इंडियाच्या **२०१६-१७** मध्ये ६२व्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलींमध्ये उपविजेते पद पटकावून **ब्रांझ पदक** मिळविले. (४) स्कुल फेडरेशन ऑफ इंडियाच्या **२०१७-१८** मध्ये ६३व्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलींमध्ये प्रथम क्रमांक पटकावून **सुवर्ण पदक** मिळविले.



# नांदा सौख्य भरे

* श्री.संपतराव गणपतराव ठुबे, रा.कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ.रश्मी** व श्री.अंकुश धोंडीबा कासार, रा.पारनेर यांचे सुपुत्र **चि.अमोल** यांचा शुभविवाह **दि.२०.०४.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.ठुबे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

* श्री.शहाजीराव बाळासाहेब गायकवाड. रा.रुई छत्रपती यांचे सुपुत्र **चि.योगेश** व श्री.प्रदीप शंकरराव धुमाळ, रा.अनवडी ता.वाई जि.सातारा यांची सुकन्या **सौ.सायली** यांचा शुभविवाह **दि.२६.०४.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.शहाजीराव गायकवाड यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

* श्री.भागचंद शिवराम तांबे, रा.गोरेगाव यांचे सुपुत्र **चि. प्रवीण** व श्री. सावळेराम आबाजी सिनरे, रा.पाडळी (गोरेगाव) यांची सुकन्या **सौ. प्राजक्ता** यांचा शुभविवाह **दि.२७.०४.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त प्रा.श्री.भागचंद तांबे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

* श्री.सोपानराव गोदाजी बोरूडे, रा.पुणेवाडी यांची सुकन्या **सौ.सोनाली** व श्री.पंढरीनाथ भगवंत झावरे, रा.वासुंदे यांचे सुपुत्र **चि.अर्जुन** यांचा शुभविवाह **दि.२७.०४.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.बोरूडे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

* श्री.वसंत गणपत मोरे, रा.यादववाडी यांचे सुपुत्र **चि.गौरव** व कै.पोपटराव ज्ञानोबा काळभोर, रा. वाकवस्ती, ता.हवेली, जि.पुणे यांची सुकन्या **सौ.दिक्षा** यांचा शुभविवाह दि.२९.०४.२०१८ रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.वसंत मोरे यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

* श्री.संतोषकुमार शिमरतमलजी शिंगवी, पारनेर यांची सुकन्या **सौ.नेहा** व श्री.प्रवीणकुमारजी मोहनलालजी सिंगी रा.जालना यांचे सुपुत्र **चि.धीरज** यांचा शुभविवाह **दि.३०.०४.२०१८** रोजी संपन्न झाला.

* श्री.परशुराम महादू मोरे, रा.वडझिरे यांचे सुपुत्र **चि.राजेश** व श्री.सिताराम चिमाजीराव लंके, रा.वडझिरे यांची सुकन्या **सौ.अश्विनी** यांचा शुभविवाह **दि.०४.०५.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.परशुराम मोरे यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.

* श्री.बाळासाहेब दिनकरराव दिवटे, रा.रुई छत्रपती यांचे सुपुत्र **चि.अमोल** व श्री.महादेव नामदेव भद्रे रा.चिचोंडी पाटील, ता.जि.नगर यांची सुकन्या **सौ.अनिता** यांचा शुभविवाह **दि.०४.०५.२०१८** रोजी संपन्न झाला.

* श्री.भास्कर खंडू खोसे, रा.पाडळी दर्या यांचे सुपुत्र **चि.प्रयाग** व श्री.फकीराशेठ बाबुराव पवार, रा.चिचोंडी पाटील ता.जि.नगर यांची सुकन्या **सौ.स्नेहल** यांचा शुभविवाह **दि.०६.०५.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.भास्कर खोसे यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.

* श्री.संपतराव रंगनाथ हांडे देशमुख, रा.जवळे यांचे सुपुत्र **चि.प्रितम** व श्री.संतोष भिमराव नलगे रा.देऊळगाव (गलांडे) ता.श्रीगोंदा यांची सुकन्या **सौ.शुभांगी** यांचा शुभविवाह **दि.०६.०५.२०१८** रोजी संपन्न झाला.

* श्री.राजेंद्र कचरदास घावटे, रा.जवळे यांची सुकन्या **सौ.प्राजक्ता** व श्री.प्रकाश लक्ष्मणराव ननावरे, रा.सातारा यांचे सुपुत्र **चि.हर्षद** यांचा शुभविवाह **दि.११.०५.२०१८** रोजी संपन्न झाला. यानिमित्त श्री.घावटे यांनी मंडळास **रू.११११/-** देणगी दिली.

* श्री.भास्कर दामोदर कोल्हे, लोणीहवेली यांची सुकन्या **सौ.सोनाली** व श्री.देवराम नानाभाऊ मापारी, राळेगण सिद्धी यांचे सुपुत्र **चि. अभिजीत** यांचा शुभविवाह **दि.११.०५.२०१८** रोजी संपन्न झाला.

* श्री.दशरथ कृष्णाजी पानमंद, रा.कासारे यांचे सुपुत्र **चि.सुजीव** व श्री.सुनील दिनकर दरंदले, रा.सोनई ता.नेवासा जि. अहमदनगर यांची सुकन्या **सौ.धनश्री** यांचा शुभविवाह **दि.१२.०५.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.दशरथ पानमंद यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

* श्री.अभिमान सोपानराव तराळ, रा.तराळवाडी यांचे सुपुत्र **चि.प्रितेश** व श्री.मनोहर चंदन बढे, रा.गुणोरे यांची सुकन्या **सौ.पुजा** यांचा शुभविवाह **दि. ०२.०७.२०१८** रोजी संपन्न झाला. प्रा.श्री.अभिमान तराळ यांनी मंडळास **रू.५००१/-** देणगी दिली.

* श्री.प्रकाश रामचंद्र देशमुख (हांडे), रा.पारनेर यांचे सुपुत्र **चि.अमित** व श्री.विष्णु केशव पाटील, रा.मोहरे, ता.बत्तीस शिराळा, जि.सांगली यांची सुकन्या **सौ.माधुरी** यांचा शुभविवाह **दि.१०.०७.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.देशमुख यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.

* श्री.भास्कर भिकाजी निघुट, रा.वडझिरे यांचे सुपुत्र **चि.स्वप्नील** व श्री.विलास कृष्णराव पाटील, रा.निमगाव, ता.येवला, जि.नाशिक यांची सुकन्या **सौ.प्रियांका** यांचा शुभविवाह **दि.१५.०७.२०१८** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.भास्कर निघुट यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.


# निधन वार्ता



* **रुक्मीणीबाई आण्णासाहेब पठारे,** रा.वडुले, वय ८५ वर्षे यांचे **दि.१५.०४.२०१८** रोजी निधन झाले.



* **गिरीधरलालजी जेठमलजी शिंगवी,** रा.कान्हुर पठार, वय ८९ वर्षे यांचे **दि.१५.०४.२०१८** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.रमेशलालजी यांनी मंडळास **रू.५१००/-** देणगी दिली.



* **सौ. विद्याताई शिरीष लोळगे,** रा.गारगुंडी, हल्ली मु.शिरूर, वय ५२ वर्षे यांचे **दि.२१.०४.२०१८** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ ॲड.शिरीष भिकाजी लोळगे यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **गुलाबराव महादेव मातेरे,** रा.बाभुळवाडे, वय ७० वर्षे यांचे **दि.१६.०५.२०१८** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांच्या पत्नी श्रीमती पुष्पाताई यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **सौ.लिलाबाई शिमरतमलजी शिंगवी,** रा.पारनेर, वय ७२ वर्षे यांचे **दि.२५.०४.२०१८** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ श्री.शिमरतमलजी दलीचंदजी शिंगवी यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **नामदेव पर्वती गवळी,** रा.अपधूप, वय ९० वर्षे यांचे **दि.१८.०४.२०१८** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.दत्तात्रय यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **विष्णु मारुती दिघे,** रा.वडझिरे, वय ८३ वर्षे यांचे **दि.०५.०५.२०१८** रोजी निधन झाले.



* **श्रीमती सिंधुताई भालचंद्र कुलकर्णी,** रा.रांजणगाव, वय ८४ वर्षे यांचे **दि.०४.०७.२०१८** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र डॉ.रमेश कुलकर्णी यांनी मंडळास **रू.१०,०००/-** देणगी दिली.



* **दिपक भालचंद्र ठुबे,** रा.कान्हुर पठार, वय ६७ वर्षे यांचे **दि.१४.०७.२०१८** रोजी निधन झाले.

## ग्रामस्थांचा सत्कार



**श्री. राहुल बाळासाहेब आहेर,** रा.पळसपुर, यांनी जाधवपूर विद्यापीठ, कलकत्ता येथून **फार्मास्युटीकल केमिस्ट्री** या विषयात **पी.एच्.डी.** पूर्ण केली.

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा, आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**




**मराठा समाजासाठी अग्रणी विवाह संस्था**

# बढे मराठा वधू-वर सूचक केंद्र

**संचालक : प्रा.रावसाहेब बढे (M.A., B.Ed.)**

**मोबाईल - ९७६२०४३६१६, ९६०४१३१०३२**

**विश्वनाथ हौ.सो.बिल्डींग नं.६०/८, दत्त मंदिराजवळ,**
**से.२८, गंगानगर, आकुर्डी, पुणे ४४**
**शाखा - अंबर प्लाझा-बी, एस.टी.स्टँड व**
**ए.डी.सी.सी.बँकेजवळ, अहमदनगर.**
www.badhemaratha.com Email : badhe.raosaheb@gmail.com



# आपण असे केले तर

* **श्री. अमृतराव क्षीरसागर,** रा. जामगाव यांनी त्यांचे जेष्ठ बंधू **कै.जयवंतराव बळवंतराव क्षीरसागर** यांचे **दि. ०२.०३.२०१८** च्या स्मृती दिना निमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



* **पिताश्री वै. सखाराम मारुतराव जगताप** (मृत्यु दिनांक ०६.०१.२०११) **व मातोश्री वै. विजयाबाई सखाराम जगताप** (मृत्यु दिनांक ०३.१०.२०१२) रा. गोरेगाव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री.संदिप व श्री.सचिन यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **स्व. बसंतीबाई बन्सीलालजी गांधी** रा.सुपे यांच्या **दि.११.०५.२०१८** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.अशोकलालजी यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



* **कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या **दि.०८.०८.२०१८** च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



* **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व. मनोज** यांच्या दिनांक **१०.०८.२०१८** च्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.




* **श्री.बाळासाहेब हरिभाऊ येणारे,** रा. रायतळे यांनी त्यांचे सुपुत्र **चि. स्वराज** याच्या दिनांक **०९.०४.२०१८** च्या वाढ-दिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **स्व.मिश्रीलालजी पेमराजजी कर्नावट** रा.वासुंदे यांच्या **दि.३०.०८.२०१८** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र **श्री. प्रमोद मिश्रीलालजी कर्नावट** यांनी **रू.५००/-** देणगी दिली.




* **श्री. शिवाजी विठ्ठलराव धुमाळ,** रा.टाकळी ढोकेश्वर यांनी त्यांचे पिताश्री विठ्ठलराव यशवंतराव धुमाळ यांच्या **दिनांक २५.०५.२०१८** च्या प्रथम स्मृती दिनानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **सौ.संजीवनी ज्ञानदेव एरंडे,** रा.वडझिरे यांच्या **एकसष्टी** निमित्त त्यांचे पती **ज्ञानदेव हरिभाऊ एरंडे** यांनी मंडळास **रू.१५००/-** रू.देणगी दिली.



* **श्रीमती मंदाकिनी आनंदराव ढोरमले,** रा.जातेगाव यांनी त्यांचे पती आनंदराव दादाभाऊ ढोरमले यांच्या **दि. ०५.०५.२०१८** च्या प्रथम स्मृती दिनानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **श्री.संभाजी दामोदर टोणगे,** रा.कोहोकडी यांनी त्यांचे पिताश्री दामोदर गेणुजी टोणगे यांच्या **दि.२३.०५.२०१८** रोजीच्या स्मृतीदिनानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **प्रा.दिलीप वामन बागुल व सौ.रजनी दिलीप बागुल** यांनी त्यांच्या **०२.०५.२०१८** रोजीच्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **कै.अरूण फकिरा हरेल,** रा.हिवरे कोरडा यांच्या **दि.०७.०७.२०१८** च्या स्मृतीदिनाप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.तुषार** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



## सेवानिवृत्ती

* **सौ.लतिका अनंत जाधव,** रा.वेसदरे या पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातून ३७ वर्षांच्या सेवेनंतर पर्यवेक्षिका या पदावरून **दि. ३१.०३.२०१८** रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



* **प्रा.राजाराम नानाभाऊ पागीरे,** रा.पिंपरी पठार हे नेहरू शिक्षण संस्था पाषाण या संस्थेच्या ज्यूनीयर कॉलेजमधून ३४ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१८** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.३०००/-** देणगी दिली.



* **प्रा.डॉ.अशोक हरिभाऊ धामणे,** रा.सारोळे कासार, ता.नगर हे रयत शिक्षण संस्थेच्या एस.एम.जोशी वरीष्ठ महाविद्यालयात रसायन शास्त्राच्या प्राध्यापक पदावर कार्यरत होते. ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३०.०४.२०१८** रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१००१/-** देणगी दिली.



कर्तृत्व पारनेरकरांचे

# आदरणीय हौसारामजी घोडके !



श्री. हौसाराम व सौ. विमल घोडके

पाराशर ऋषींच्या तपश्चर्येने पावन झालेला, सेनापती बापटांच्या क्रांतीकारक चळवळीने पूनीत झालेला व पद्मविभुषण आण्णासाहेब हजारे यांच्या निष्काम कर्मयोगाने आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रसिद्ध पावलेला आमचा पारनेर तालुका.

पारनेर हे घोडके आण्णांचे गाव. आजोबा भवानराव यांना भवानीबाबा असे लोक म्हणत असत. घोडके आण्णांना मी लहानपणापासूनच पाहात आहे. त्यांचे आजोबा अती भोळे सांब त्यामुळेच भूमीहीन झालेले, त्यांचे एकुलते एक चिरंजीव म्हणजे **अण्णांचे वडील विठ्ठलराव !** विठ्ठलराव साधारण २ वर्षाचे असताना त्यांच्या आईचा मृत्यू झाला. आण्णांच्या आजोबांनीच आईवडीलांची भूमिका निभावून विठ्ठलला मोठे केले. आण्णांच्या वडीलांना नाना म्हणत. नानांनी लहानपणापासून काबाडकष्टात दिवस काढले. दोघेच घरात असल्यामुळे धुणे, भांडी, स्वयंपाक करून मजुरीवर जाण्याशिवाय त्यांच्याकडे पर्याय नव्हता. तश्याही परिस्थितीत नाना सातवी पास झाले. त्या वेळच्या रितीरिवाजानुसार त्यांचे लग्नही झाले. घरात १८ विश्व दारिद्र्य, त्यात खाण्याचे एक तोंड वाढलेले, त्यामुळे नवरा बायको उभयतांनी मुंबईचा रस्ता धरला व तेथे जाऊन मजुरी करू लागले. नानांची काहीतरी करण्याची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. मुंबईहून गावी आले असता त्यांना कळले कि, मिलीटरीमध्ये भरती चालू आहे. १९३० मध्ये ते मिलीटरीत भरती झाले. आता घरची आर्थिक स्थिती दोन वेळच्या जेवणाइतकी सुधारली. तिथून सेवानिवृत्त झाल्यावर ते पोलीस खात्यातमध्ये भरती झाले. हे सर्व होत असताना आण्णांची निरक्षर **आई सौ.सिताबाई** लोकांच्या शेतावर मोलमजुरी करून घरचे पाहात असे. आजोबांचे निधन झाल्यावर वडीलांचे सर्व कुटुंब नोकरीच्या ठिकाणी असे. तेथेसुद्धा आई मोलमजुरीच करीत असे. आई अत्यंत कर्तव्यदक्ष, व्यवहारी, तसेच कोणाच्याही मदतीला धावून जाण्याच्या तिच्या वृत्तीमुळे ती परिसरात नेहमीच आदरणीय असे. **आईनेच सर्व भावंडांना एक तीळ सात जणांनी वाटून खावा ही शिकवण मनी बिंबवली.**

**आईमुळे सर्व भावंडे पैशाने नाही पण संस्काराने श्रीमंत झाली.** वडील सुरुवातीला मिलीटरी मध्ये असल्यामुळे त्यांचे भारतभर फिरणे झाले होते. नंतर पोलीसमध्ये भरती झाल्यामुळे त्यांचा सर्व समाजांशी संबंध आला. **वडिलांनी सर्वांना शिस्त व वक्तशीरपणा शिकविला. त्यांनी आणखी एक संस्कार दिला तो म्हणजे जातीभेद न पाळण्याचा.** त्यामुळेच त्या काळात सुद्धा आमच्या घरात सर्वांनाच प्रवेश असे.

आण्णा धरून सहा भावंडे, तीन बहिणी व तीन भाऊ. मुलांमध्ये आण्णाच मोठे. बदलीमुळे शिक्षण एका गावी कधीच झाले नाही. वडिलांची जिथे बदली तिथे त्यांचे शिक्षण. तो १९५० चा काळ सर्वांना जिल्हा लोकल बोर्डाच्या शाळेतच प्रवेश घ्यावा लागे. कोठेही खाजगी शाळा किंवा क्लासेस नव्हते. शिक्षक अतिशय तळमळीने शिकवत असत. आण्णा सातवीत असताना वर्षभर अभ्यासासाठी शाळेतच झोपत असत. त्यांच्या शालेय जीवनात म्हणजे ११वी पर्यंत ते नेहमी पहिल्या ३ नंबरमध्येच असत.

गाव पारनेर असले तरी वडीलांच्या नोकरीमुळे मुलांनी गाव पाहिलेच नव्हते. पण १९५७ मध्ये कुळकायदा आल्यानंतर वडीलांनी सर्वांना गावी ठेवून ते एकटेच नोकरीच्या ठिकाणी राहात असत. आण्णांचे ९वी ते ११वी (जुनी) पर्यंतचे शिक्षण सेनापती बापट विद्यालय, पारनेर येथे झाले. १९६० मध्ये ते ११वी पास झाले. त्यावेळी ६०% मार्क्स मिळणे म्हणजे फार मुश्किल असे. वर्गात फक्त दोनच विद्यार्थ्यांना ६०% पेक्षा जास्त गुण प्राप्त झाले होते. त्यापैकी एक घोडके आण्णा.

पुढील शिक्षणाची क्षमता असूनसुद्धा घरच्या परिस्थितीमुळे शिक्षण घेणे शक्य झाले नाही. पुण्यामध्ये वाडीया कॉलेजमध्ये आय.टी.आय. मेकॅनिकल ड्राफ्टस्मनचा अभ्यासक्रम पूर्ण करून आण्णा १९६२ मध्ये अहमदनगर येथे संरक्षण विभागामध्ये नोकरीस लागले. त्या काळात त्यांच्या बरोबरचे बरेच मित्र कॉलेजमध्ये शिकत होते. त्यांचे घरून एस.टी.ने डबे येत असत. कधी कधी डबा न आल्यामुळे उपाशी राहण्याची वेळ त्यांच्यावर येत असे. मदत करण्याची खूप इच्छा असायची. पण सर्वांची परिस्थिती सारखीच. त्यावेळेस त्यांना जाणवयाला लागले कि मुले कोठेतरी आणि कसेही राहतात. त्यांना जर चांगल्या व स्वस्त निवासाची सोय झाली तर किती चांगले होईल. पण मार्ग सापडत नव्हता. कधीकधी कोणी अडचणीस आला तर नोकरी असल्यामुळे थोडी आर्थिक मदत करता येत होती. आपण समाजासाठी काहीतरी करावे याचे बिजारोपण त्यांना तेथेच झाले. १९६२ ते १९६८ पर्यंत ते नगरला होते. त्यानंतर पुणे येथे टेल्को कंपनीमध्ये (आताची टाटा मोटर्स) मध्ये रुजू झाले व आर्थिकदृष्टया स्थीर झाले.

१९७७ मध्ये पारनेर तालुक्यातील पुण्यामध्ये राहणाऱ्या जाणकार लोकांनी भारत इंग्लिश स्कुल, शिवाजीनगर येथे सभा बोलाविली. त्या सभेस आण्णा हजर होते. त्या सभेमध्ये असे ठरले की, पुण्यामध्ये पारनेरकरांची एक संस्था असावी. त्या सभेतच भोंग गुरूजींची अध्यक्ष म्हणून निवड झाली. अचानकपणे आण्णांना समाजसेवेचा मार्ग दिसू लागला. त्यामध्ये सक्रीय भाग घ्यावा अशी आंतरीक इच्छा निर्माण झाली. दि. ०३.१२.१९७९ साली पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची धर्मादाय आयुक्त, पुणे यांचेकडे नोंदणी केली व सर्वांनी मिळून धुमधडाक्यात काम सुरू केले.



ज्येष्ठ समाजसेवक मा.अण्णासाहेब हजारे यांच्या हस्ते मंडळाचे अध्यक्ष श्री.हौसाराम घोडके व सौ.विमल हौसाराम घोडके सत्कार स्विकारताना.

त्यांचे वास्तव्य पारनेर मध्ये १९५७ ते ६० पर्यंतच होते. पण या

गावाने त्यांना संस्कारीत केले. स्वतःचे गाव म्हणजे काय प्रकार असतो त्याची त्यांना जाणीव झाली व गावासाठी काहीतरी केलेच पाहिजे अशी उर्मी त्यांना नगर पासून स्वस्थ बसू देत नव्हती. या सभेमुळे समाजसेवेचा मार्ग त्यांना सापडला व त्यांनी झोकून काम करावयास सुरुवात केली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भोंग गुरूजींच्या पितृतूल्य मार्गदर्शनाखाली सर्वांनी वाटचाल सुरू केली. तीनच वर्षात म्हणजे १९८२ साली कोथरूड येथे भाड्याच्या जागेत ८ खोल्या बांधून २५ मुलांचे वसतिगृह सुरू केले. २००२ पर्यंत अतिशय स्वस्त दरात ते चालविले. २००२ मध्ये ती जागा रस्तारूंदीमध्ये गेल्यामुळे सोडावी लागली. नंतर मंडळाने ठरविले की स्वतःच्याच जागेत वसतिगृह बांधायचे. २००५ मध्ये ५ गुंठे जागा विकत घेवून २०१० मध्ये ८० मुलांचे अद्ययावत वसतिगृह बांधून पूर्ण केले व आता वरील दोन मजल्यांचे काम पूर्ण झाल्यामुळे १६० विद्यार्थी तेथे राहू शकतील.



शैक्षणिक व सामाजिक तसेच विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह बांधल्याबद्दल **गुरूवर्य बाबुराव जगताप शतकोत्तर रौप्य महोत्सव जयंती** निमित्त मा.विनोद तावडे, मा.प्रभाकर देशमुख, मा.बाबा आढाव, कुलगुरू प्रभाकर ताकवले यांच्या हस्ते विशेष सत्कार.

वसतिगृहाशिवाय अनेक उपक्रम मंडळ राबविते. त्यामध्ये विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, आजारी व्यक्तींना आर्थिक मदत, जुने सुस्थितीतील कपडे गोळा करून त्याचे ग्रामीण भागात वाटप करणे अशा प्रकारचे पारनेर तालुका मित्र मंडळाचे काम चालू असते.

मला इथे नमूद करावेसे वाटते की, **पारनेरच्या मातीतच सामाजिक जाणिवेचा सुगंध आहे. त्याचमुळे इतकी मोठे कामे होतात. नाहीतर तसा पारनेर दुष्काळी तालुका. पण पुण्यामध्ये अल्पावधीतच लोकवर्गणीतून ३ कोटी रुपयांचा प्रकल्प उभा राहिला. सर्वांनी घरचेच काम समजून प्रतिसाद दिल्यामुळे हा सामाजिक व शैक्षणिक जाणिवेचा गोवर्धन पर्वत सर्व पारनेरकरांनी उचलला.**

समाजसेवेचे व्रत हाती घेतलेल्या घोडके आण्णांनी आजपर्यंत सतत समाजसेवा केली. पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष म्हणून ते सतत निस्वार्थ सेवा करत आहेत. त्यांच्या निष्काम कर्मयोगाने चार मजली इमारत उभी राहिली आहे. सकाळी सुमारे साडेसहा वाजता ते घरातून बाहेर पडतात. पुणे व पिंपरी चिंचवड परिसरात त्या त्या भागातील मंडळाच्या सदस्यांना बरोबर घेऊन देणगी रूपाने निधी संकलन करणे हा त्यांचा आवडीचा छंदच बनला आहे.

वंदनीय समाजसेवक हौसाराम आण्णा यांनी टेल्को कंपनीमध्ये नोकरी केली. पगारातील काही रक्कम ते वसतिगृह निधीसाठी सतत जमा करत आले. **आधी केले मग सांगितले या उक्तीप्रमाणे आज सर्वाधिक रू.४,१५,००० देणगी देणारे कोण असतील तर ते आण्णाच.** नोकरी संपल्यानंतर पूर्णवेळ समाजसेवा करण्याचे व्रत त्यांनी हाती घेतले.

आज वयाची पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झाली आहेत. **आण्णा, आम्हा सर्व पारनेकर बांधवाच्या वतीने पंच्याहत्तरी निमित्त आपणास लाख लाख शुभेच्छा !**

आपण आता आराम करावे असे आपले वय. शरीर थकलेले असताना, प्रकृतीची थोडी कुरबूर .... आपण विद्यार्थ्यांच्या हितासाठी वसतिगृह इमारत पूर्ण व्हावी म्हणून सतत पायाला भिंगरी लावून देणगी गोळा करण्यासाठी फिरत आहात. **तुमच्या वाणीतून विद्यार्थी हितासाठी तळमळणारा, वसतिगृहाची काळजी करणारा असामान्य समाजप्रबोधन करणारा समाजसेवक तुमच्या रूपाने आम्हाला दिसत आहे.** आपल्या वयाची पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झाली आहेत व दुसरीकडे वसतिगृहाची इमारत पूर्णत्वाला आली आहे. या दोनही गोष्टीचा रास्त व मनापासून अभिमान पारनेर तालुका मित्र मंडळाच्या सर्व सभासद व विश्वस्त मंडळाला आहे.

तुमच्या लहानपणी वाट्याला आलेले दुःख, शिक्षणासाठी झालेली ससेहोलपट ही आजच्या पिढीतील हुशार विद्यार्थ्यांची होऊ नये म्हणून आपण आयुष्यभर झिजत राहिलात. आसवांनी भिजलेले तुमचे दुःखाचे घोंगडे, आतड्याला पीळ द्यावा तसे पीळून तुम्ही समाजाच्या वेशीवर टांगले. निर्भयता, साधेपणा आणि स्वतःला विसरण्याची शक्ती हे तपस्व्याचे गुणधर्म आपल्यात आहेत. नवीन पिढीसाठी आपण आदर्श आहात. तुमचे शरीर थकले तरी दुष्काळी भागातील हुशार विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होण्याचे स्वप्न तुमच्या डोळ्यात कायम आहे. निरहंकारी, साधी सरळ राहणी असणाऱ्या आपल्या मूर्तींत पारनेरकर बांधवांसाठीचा अभिमान आपल्या वाणीतून सतत दिसतो. म्हणूनच दुष्काळी पारनेर तालुक्यात बुद्धीची श्रीमंती आहे हे आपण कायम सांगत असता याचा मला अभिमान आहे.

चालू वर्ष हे घोडके आण्णांचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. आजही त्यांना घरी बसवत नाही. सुदैवाने सर्व पारनेरकर मंडळी या कामात उत्साही असल्यामुळे सर्व प्रकारची मदत करतात. **या सर्व कामात अण्णांच्या पत्नी सौ.विमलाताई यांच्या सहकार्याचा अनमोल वाटा आहे.** कारण आण्णा कायम घराबाहेर. त्यामुळे घरगुती अडीअडचणी त्यांच्या पत्नीने त्यांच्यापर्यंत कधीच येऊ दिल्या नाहीत. मुलांचे शिक्षण व त्यांना संस्कारीत करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा. मुले सुद्धा त्यांच्या कार्यक्षेत्रात योग्यरित्या स्थिरावून प्रगती करीत आहेत व सामाजिक कार्यात सुद्धा हातभार लावत आहेत.

शब्दांकन – **प्रा.सुनील राजेनिंबाळकर**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०१७ ते ३१.०३.२०१८ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. | खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | | बँक चार्जेस | ४५०.३० | |
| रोख | ८,५००.०० | | दिवाळी बोनस | २०,०००.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१ | २६,०७५.०० | | व्यवस्थापक पगार | १,३१,०००.०० | |
| स्टेट बँक ४९७८ | ११,७९९.७५ | | सहव्यवस्थापक पगार | ३०,०००.०० | |
| महानगर को-ऑप.बँक १६१ | ३०,१८०.०० | | स्विपर पगार | ५३,५००.०० | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | २५,३१५.१५ | | वॉचमन पगार | १,४३,०००.०० | |
| | ---------- | १,०१,८७९.९० | शैक्षणिक मदत | १२,०००.०० | |
| | | | विज बिल खर्च | १,६१,६००.०० | |
| बचत ठेव व्याज खाते | | ३१,६३१.०० | कर्ज व्याज | ३,०००.०० | |
| मुदत ठेव व्याज खाते | | १,३६,५४२.०० | देखभाल व दुरुस्ती खर्च | ४३,४९१.०० | |
| वसतिगृह शुल्क | | १०,९४,५५०.०० | छपाई स्टेशनरी खर्च | ३९,०९८.०० | |
| फॉर्म फी | | १,८३०.०० | पोस्टेज | ५,३५०.०० | |
| वसतिगृह दंड | | ११,९६०.०० | मासिक सभा खर्च | २,५०५.०० | |
| वसतिगृह विज बिल जमा | | ८,६२४.०० | पी.सी.एम.सी. कर | ४६,०४४.०० | |
| | | | पाणीपट्टी | २,६४५.०० | |
| इमारत निधी | | १६,३०,११२.०० | लिहीणावळ खर्च | १७,५००.०० | |
| | | | ऑडिट फी | १२,५००.०० | |
| मुदत ठेव कर्ज | | ७,००,०००.०० | वार्षिक समारंभ खर्च | ५०,६२५.०० | |
| | | | प्रवास खर्च | १६,२०५.०० | |
| अनामत - | | | झेरॉक्स व टायपींग खर्च | ३,८६५.०० | |
| घशींग | ६,०००.०० | | वेबसाईट खर्च | ९,०००.०० | |
| संजय जंगम | २,०००.०० | | टी.डी.एस. दंड | ४००.०० | |
| नाटेकर | १,०००.०० | | | -------- | ८,०३,७७८.३० |
| | ------ | ९,०००.०० | टेंडर अनामत | | |
| | | | साळुंके इलेक्ट्रिकल्स | ४,४००.०० | |
| वसतिगृह सुरक्षा ठेव | | ९४,५००.०० | समृद्धी इलेक्ट्रिकल्स | ४,४००.०० | |
| टी.डी.एस. ठेकेदार | | ९४,४५१.०० | | ------ | ८,८००.०० |
| मुदत ठेव जमा | | २१,२८,६८२.०० | वसतिगृह सुरक्षा ठेव | | ९७,५००.०० |
| | | | टी.डी.एस. कॉन्ट्रॅक्टर | | ९४,४५१.०० |
| सुरक्षा ठेव - बांधकाम | | | टी.डी.एस.२०१६-१७ | | ९,६०९.०० |
| अभिजीत कन्स्ट्रक्शन | ६४,३६१.०० | | बांधकाम खर्च | | ४३,५४,३२०.०० |
| अवधुत इलेक्ट्रिकल्स | ७,३६४.०० | | फर्निचर व इलेक्ट्रिकल्स | | ३,६९,४४४.०० |
| | ------- | ७१,७२५.०० | | | |
| | | | **अखेर शिल्लक** | | |
| | | | रोख | ८४८.०० | |
| | | | बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१ | ४,८९३.७५ | |
| | | | स्टेट बँक ४९७८ | २९,३५१.०० | |
| | | | महानगर को-ऑप.बँक १६१ | २,७७,३६०.८० | |
| | | | सुवर्णयुग सह.बँक १७७० | ६५,१२१.०५ | |
| | | | | --------- | ३,७७,५७४.६० |
| **एकूण रक्कम** | | **६१,१५,४७६.९०** | **एकूण रक्कम** | | **६१,१५,४७६.९०** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०१७ ते ३१.३.२०१८ अखेरचे

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| बँक चार्जेस | ४५०.३० | | बचत ठेव व्याज खाते | | ३१,६३१.०० |
| दिवाळी बोनस | २०,०००.०० | | मुदत ठेव व्याज खाते | | १,३६,५४२.०० |
| व्यवस्थापक पगार | १,३१,०००.०० | | | | |
| सहव्यवस्थापक पगार | ३०,०००.०० | | वसतिगृह शुल्क | | १०,९४,५५०.०० |
| स्विपर पगार | ५३,५००.०० | | फॉर्म फी | | १,८३०.०० |
| वॉचमन पगार | १,४३,०००.०० | | | | |
| शैक्षणिक मदत | १२,०००.०० | | वसतिगृह दंड | | ११,९६०.०० |
| विज बिल खर्च | १,६१,६००.०० | | वसतिगृह विज बिल जमा | | ८,६२४.०० |
| कर्ज व्याज | ३,०००.०० | | | | |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | ४३,४९१.०० | | | | |
| छपाई स्टेशनरी खर्च | ३९,०९८.०० | | | | |
| पोस्टेज | ५,३५०.०० | | | | |
| मासिक सभा खर्च | २,५०५.०० | | | | |
| पी.सी.एम.सी. कर | ४६,०४४.०० | | | | |
| पाणीपट्टी | २,६४५.०० | | | | |
| लिहीणावळ खर्च | १७,५००.०० | | | | |
| ऑडिट फी | १२,५००.०० | | | | |
| वार्षिक समारंभ खर्च | ५०,६२५.०० | | | | |
| प्रवास खर्च | १६,२०५.०० | | | | |
| झेरॉक्स व टायपींग खर्च | ३,८६५.०० | | | | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | | | | |
| टी.डी.एस. दंड | ४००.०० | | | | |
| | -------- | ८,०३,७७८.३० | | | |
| घसारा | | ८४,४४४.०० | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | ३,९६,९१४.७० | | | |
| **एकूण रक्कम** | | **१२,८५,१३७.००** | **एकूण रक्कम** | | **१२,८५,१३७.००** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत**
**म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !**
**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा,**
**आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०१८ अखेरचे

| जिंदगी व देणी | रक्कम रू. | रक्कम रू. | स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | | **स्थिर मालमत्ता** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० | **जमीन खरेदी** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| **इतर निधी** | | | **इमारत बांधकाम** | | |
| **इमारत निधी** | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | १०७,५९,००३.०० | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,५९,५०,३७६.०३ | | अधिक जमा – चालू वर्षी | ४३,५४,३२०.०० | |
| अधिक जमा – चालू वर्षी | १६,३०,११२.०० | | | ----------- | १,५१,१३,३२३.०० |
| | ------------ | १,७५,८०,८८८.०३ | **टी.डी.आर. –** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | | २१,१३,१०५.०० |
| **शैक्षणिक फंड –** | | | **पी.सी.एम.सी. चार्जेस (बांधकाम)** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० | मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,५३,१००.०० |
| **अंत्यविधी जमा निधी –** | | | **बोअरवेल –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०५०.०० |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० | **मोटर पंप –** | | |
| | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | १५,८५४.०० | |
| **मुदत ठेवीवरील कर्ज** | | ७,००,०००.०० | वजा – घसारा ४०% | ६,३४२.०० | |
| | | | | -------- | ९,५१२.०० |
| **वसतिगृह सुरक्षा ठेव –** | | | **फर्निचर व फिक्चर्स –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,५५,४५६.०० | | मागील ताळेबंदाप्रमाणे | ४,९१,११८.०० | |
| अधिक जमा – चालू वर्षी | ९४,५००.०० | | अधिक जमा चालू वर्षी | ३,६९,४४४.०० | |
| | ---------- | | | -------- | |
| | २,४९,९५६.०० | | | ८,६०,५६२.०० | |
| वजा – चालू वर्षी | ९७,५००.०० | | वजा – घसारा १०% | ७५,६४१.०० | |
| | ---------- | १,५२,४५६.०० | | --------- | ७,८४,९२१.०० |
| | | | **वॉटर प्युरिफायर खरेदी** | | |
| **उत्पन्न खर्च खाते –** | | | मागील ताळेबंदाप्रमाणे | ६,१५२.०० | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १६,६७,३०४.८७ | | वजा – घसारा ४०% | २,४६१.०० | |
| चालू वर्षी | ३,९६,९१४.७० | | | ------- | ३,६९१.०० |
| | ----------- | २०,६४,२४९.५७ | **वृक्ष संवर्धन ठेव –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| | | | **एम.एस.सी.बी. डिपॉझीट –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| **टेंडर अनामत –** | | | **मुदत ठेव** | | ८,००,०००.०० |
| अभिजीत कन्स्ट्रक्शन | १,७२,६००.०० | | टी.डी.एस. २०१६–१७ | | २०,२७२.०० |
| अवधुत इलेक्ट्रिकल्स | ८,८००.०० | | टी.डी.एस. २०१७–१८ | | ९,६०९.०० |
| | ---------- | १,८१,४००.०० | **रोख व बँक शिल्लक –** | | |
| **सुरक्षा अनामत – बांधकाम** | | | रोख | ८४८.०० | |
| अभिजीत कन्स्ट्रक्शन | | | बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१ | ४,८९३.०० | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,०८,६३९.०० | | स्टेट बँक ४९७८ | २९,३५१.७५ | |
| चालू वर्षी | ६४,३६१.०० | | महानगर को–ऑप.बँक १६१ | ६५,१२१.०५ | |
| | --------- | १,७३,०००.०० | सुवर्णयुग सह.बँक १७७० | २,७७,३६०.८० | |
| अवधुत इलेक्ट्रिकल्स | | | | --------- | ३,७७,५७४.६० |
| चालू वर्षी | | ७,३६४.०० | | | |
| **एकूण रक्कम** | | **२,११,५९,४६८.६०** | **एकूण रक्कम** | | **२,११,५९,४६८.६०** |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | हौसाराम घोडके | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर /९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा. सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११५५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये–

**✣ संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय ✣ तत्पर सेवा ✣ ठेवीवर आकर्षक व्याजदर ✣ सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार ✣ विनयशील कर्मचारी वर्ग ✣ सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.**



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
संस्थापक अध्यक्ष




श्री.अरुण मार्तंड नरसाळे
अध्यक्ष




श्री.कुंडलिक विश्वनाथ घोडके
उपाध्यक्ष



श्री.पोपटराव आनंदराव जाधव
संचालक



श्री.गोविंद दामोधर ढोरमले
संचालक



श्री.पांडुरंग विश्वनाथ चाफे
संचालक



श्री.नवीनचंद्र श्रीकिसन नाबरिया
संचालक



श्री.निशांत रंगनाथ गिरी
संचालक




सौ.अलका दिलीप हरेल
संचालिका



सौ.राधाबाई मुरलीधर चौधरी
संचालिका



श्री.सोमा भिमा दाते
संचालक




## -: विशेष सूचना :-

- ☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**
- ☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.
- ☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.
- ☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.
- ☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.
- ☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.



संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ठुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.सुनील कुंडलीक पोटे व मुद्रक श्री.सुनील मुरलीधर तोटे (suniltote11@gmail.com) (M: 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून **'पारनेर भवन', मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३** येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ____________________

____________________

____________________

____________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०